ईश्वरप्राप्तीसाठी साधना : खंड २

# आनंदप्राप्तीसाठी अध्यात्म

## (सुख, दुःख अन् आनंद यांचे शास्त्रीय विश्लेषण)

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**पू. संदीप गजानन आळशी**



**सनातन संस्था**



**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४४, इंग्रजी २०१, कन्नड १९८, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली २९, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**फेब्रुवारी २०२४ पर्यंत ३६५ ग्रंथांच्या १३ भाषांत ९५ लाख ७५ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या आध्यात्मिक संशोधनकार्याचा संक्षिप्त परिचय



१. ‘ईश्वरप्राप्तीसाठी कला’ याविषयी मार्गदर्शन आणि संगीत, नृत्य इत्यादी कलांचे सात्त्विक सादरीकरण करण्याविषयी संशोधन

२. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

३. शारीरिक आणि मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

४. १.२.२०२४ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २२७ अन् अन्य ९१२ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

५. स्वतःचा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा) देह, स्वतःच्या वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधन अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

(संपूर्ण परिचयासाठी वाचा – **www.Sanatan.org**)

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले

१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


१. सुखदुःख ९

१ अ. व्याख्या १ आ. महत्त्व ९

१ इ. दुःखाचे महत्त्व १ ई. दुःखाची लक्षणे ११

१ उ. सुखदुःखाची अपरिहार्यता १३

१ ऊ. सुख आणि आनंद हे शब्द निरनिराळ्या अर्थाने वापरल्याने होणारा गोंधळ १४

१ ऐ. सुखदुःखाच्या तुलनेत आनंद कोठे आहे ? १८

१ ओ. सुखदुःखाचे प्रकार १ औ. सुखाचे प्रकार १८

१ अं. सुखदुःखाची परमावधी २२

१ क. सुखप्राप्ती आणि दुःखनिवृत्ती यांचे प्रयत्न २३

१ घ. सप्तलोक आणि सुख १ च. काळ आणि सुखदुःख २७

१ छ. सुखदुःखाची कारणे १ ट. दुःख पूर्णतः टाळणे २९

२. आनंद ६५

२ अ. व्याख्या २ आ. समानार्थी शब्द ६५

२ इ. सुख आणि आनंद हे शब्द निरनिराळ्या अर्थाने वापरल्याने होणारा गोंधळ ६५

२ ई. सुख आणि आनंद यांतील भेद ६५

२ उ. सुखदुःखाच्या तुलनेत आनंद कोठे आहे ? ६५

२ ऊ. आनंद आणि शांती ६६

२ ए. आनंदाचे प्रकार, शांतीचे प्रमाण आणि कुंडलिनीचक्रस्थान ६६

२ ओ. आनंद मिळावा, अशी इच्छा का होते ? ६६

२ औ. आत्मा (जीव) आनंदरूप असूनही त्याला आनंदाची अनुभूती का येत नाही ? ६७

२ अं. जिवाला आनंदाचा कंटाळा का येत नाही ? ६८

२ क. सप्तलोक आणि आनंद २ ख. काळ आणि आनंद ६८

२ ग. आनंद कसा मिळवायचा ? ६८

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ७४

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या ‘सच्चिदानंद परब्रह्म’ या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये ‘प.पू.’ आणि ‘परात्पर गुरु’ या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

## मनोगत

मनुष्याचीच नव्हे, तर अन्य प्राणीमात्रांचीही धडपड जास्तीतजास्त सुख कसे मिळेल, यासाठी असते. याकरता प्रत्येक जण पंचज्ञानेंद्रिये, मन आणि बुद्धी यांच्याद्वारे विषयसुख उपभोगण्याचा प्रयत्न करतो; परंतु विषयसुख हे तात्कालिक आणि निकृष्ट प्रतीचे असते, तर आत्मसुख, अर्थात आनंद हा चिरंतन अन् सर्वोच्च प्रतीचा असतो. आत्मसुख प्राप्त करून देणारी गोष्ट म्हणजे अध्यात्म. म्हणूनच 'सुखं च न विना धर्मात् तस्मात् धर्मपरो भवेत् ।' म्हणजे 'खरे सुख (आनंद) हे धर्माचरण केल्याविना मिळत नाही; म्हणून सदा धर्माचरण करावे', असे म्हटले आहे. अध्यात्माची कास धरून, म्हणजे साधना करून आत्मसुख मिळवण्यासाठी प्रयत्न केल्यास लौकिक आणि पारलौकिक सुख, ही आनुषंगिक फलेही प्राप्त होतात.

अध्यात्माचे इतके महत्त्व असतांना खेदाची गोष्ट म्हणजे बहुतेकांना अध्यात्म या शब्दाचा अर्थही ज्ञात नसतो. त्यामुळे अध्यात्मासारख्या सर्वोच्च आनंद आणि सर्वज्ञता देणाऱ्या विषयाकडे फारच थोडे जण वळतात. विषयसुखाच्या अनंतपटीने आनंद असतो, हे कळले तर विषयसुखापेक्षा आनंदाच्या प्राप्तीसाठी कोणीही प्रयत्न करील. असे प्रयत्न व्हावेत, हाच उद्देश मनात ठेवून हा ग्रंथ लिहिला आहे. विषयसापेक्ष सुख आणि विषयनिरपेक्ष आनंद यांतील भेद काय, सुखदुःखाची कारणे कोणती, ती कारणे दूर करून त्यांच्या पलीकडच्या आनंदाची अनुभूती कशी घ्यायची, इत्यादी विषयांचे विवेचनही यात केले आहे.

अध्यात्म हा केवळ बौद्धिक स्तरावर समजून घेण्याचा विषय नाही, तर प्रत्यक्ष कृती करून अनुभूती घेण्याचा विषय आहे. हा ग्रंथ वाचून काही जणांनी तरी साधनेला आरंभ करावा आणि साधनेने त्यांच्या अंतर्यामी आनंदाचा झरा लवकर निर्माण व्हावा, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

---

(सनातनच्या 'अध्यात्मशास्त्र'विषयीच्या सर्व ग्रंथांचे सामाईक मनोगत 'धर्माचे मूलभूत विवेचन' या ग्रंथात दिले आहे.)